अकोला, दि. २६ - शहरातील नायगाव येथील डम्पिंग ग्राउंडवर कोरोनाबाधित रुग्णांना हाताळण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पीपीई किट उघड्यावर फेकून देण्यात आल्याच्या प्रकाराची मनपा आयुक्त संजय कापडनीस यांनी गंभीर दखल घेत याप्रकरणी मनपाचे प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. फारुख शेख, स्वच्छता विभाग प्रमुख प्रशांत राजूरकर, मोटर वाहन विभाग प्रमुख श्याम बगेरे यांना 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आली आहे. सदर नोटीशीला २४ तासांच्या आत उत्तर सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

महापालिका क्षेत्रात कोरोनाबाधित रुग्णांनी ४२८ चा आकडा गाठला आहे. शहराच्या विविध भागांत कोरोनाची लागण झालेले रुग्ण आढळून येत आहेत. कोरोनामुळे सर्वसामान्य अकोलेकरांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. अशा परिस्थितीमध्ये शहरातील कचरा साठवणूक केल्या जाणाऱ्या नायगाव येथील डम्पिंग ग्राउंड येथे कोरोनाबाधित रुग्णांना हाताळण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पीपीई कीट उघड्यावर फेकून देण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. शहरात कोरोनाचा संसर्ग झपाट्याने होत असताना पीपीई किटची बायोमेडिकल वेस्टच्या निकषानुसार विल्हेवाट लावणे गरजेचे असताना ते कीट उघड्यावर टाकून देण्यात आल्याने नायगाव परिसरातील स्थानिक रहिवाशांमध्ये भीती निर्माण झाली. याप्रकरणी प्रभागातील काँग्रेसचे नगरसेवक पराग कांबळे यांनी जिल्हा सामान्य रुग्णालय प्रशासन तसेच महापालिका प्रशासनासोबत चर्चा करून दोषी व्यक्तींवर कारवाईची मागणी लावून धरली होती. तसेच, याप्रकरणी राज्याच्या आरोग्य मंत्र्यांकडे तक्रारही केली.

# माझा वाढदिवस साजरा करू नका : नितीन गडकरी

**प्रतिनिधी**

नागपूर, दि. २६ - यंदा संपूर्ण देशात कोरोनाने थैमान घातले आहे. त्यामुळे गेल्या मार्च महिन्यापासून संपूर्ण भारतात लॉकडाऊन आहे. जगात अनेक लोक या कोरोनामुळे प्रभावित झालेले आहेत. अशा अनेक कुटुंबांना आधार देण्याच्या कामात सर्व कार्यकर्ते लागले आहेत. अशावेळी आपला वाढदिवस साजरा करणे योग्य नाही, असे मत केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले आहे.

२७ मे रोजी वाढदिवस साजरा करण्यासाठी वा शुभेच्छा देण्यासाठी कोणी भेटू नये, अशी भावनिक साद गडकरी यांनी घातली आहे. ते म्हणाले, माझ्या मित्रांना, सर्व नेत्यांना, कार्यकर्त्यांना व नागरिकांना माझी विनंती आहे की, यावर्षी निर्माण झालेली बिकट परिस्थिती लक्षात घेता कोणीही अभिनंदन देण्याकरिता किंवा वैयक्तिक भेटायला येऊ नये. त्यामुळे लॉकडाऊनच्या नियमाचे उल्लंघन होईल व सुरक्षित अंतर पाळण्यास कठीण होईल. अशावेळी आपण आपापल्या क्षेत्रात लॉकडाऊनचे नियम पाळून गरजूंना सहकार्य करावे. आपले प्रेम व शुभेच्छा माझ्यासोबत आहेतच. यावर्षी कुठलाही खर्च करून वाढदिवसानिमित्त कार्यक्रम ठेवू नये व एकत्र येऊ नये, असे आवाहनही गडकरी यांनी केले आहे.

## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यांत येते की, आम्ही येथे खालील **परिशिष्टांत** सविस्तर वर्णन लिहिलेल्या मिळकतीच्या **(''सदर मिळकत'')** संबंधात **बोरिवली राजहौंस को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड** चे हक्क तपासत आहोत ज्यांनी अंतिम प्रस्ताव आणि परस्पर सामंजस्याने आमच्या अशिलांना विकास अधिकार बहाल करण्याचे ठरवले आहे. सदर जागेच्या संबंधात विक्री, अदलाबदल, दान, गहाण, भार, धारणाधिकार, भाडेपट्टा, कुळ वहिवाट, न्यास, पोटगी, वारसा, कब्जा, परवाना किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही दावा असलेल्या सर्व व्यक्तिंनी कृपया तसे लेखी स्वरुपांत कागदोपत्री पुराव्यांसह निम्नस्वाक्षरीकारांना त्यांच्या कार्यालयांत ७०१, फ्लाय एज, ७६५, एस. व्ही. रोड, बोरिवली पश्चिम, मुंबई-४०००९२ येथे (किंवा टाळेबंदी चालू असल्यास **sdmishra03@gmail.com** वर ईमेलने) ह्या प्रसिध्दीच्या तारखेपासून १४ दिवसांच्या कालावधीत कळवावे, कसूर केल्यास, अशा व्यक्तीचा दावा सोडून दिल्याचे आणि/किंवा त्यागल्याचे समजले जाईल.

**वर उल्लेख केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट:**
**(''सदर मिळकतीचे'' वर्णन)**

मुंबई उपनगर च्या नोंदणी जिल्ह्यातील गाव एकसरच्या एकसर रोड, तालुका बोरिवली, मुंबई उपनगर जिल्हा येथे स्थित बोरिवली राजहौंस को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. मध्ये समाविष्ट त्यावर उभ्या 'बोरिवली राजहौंस' नावाच्या सध्याच्या इमारतीसह एकत्रितरित्या सुमारे १००६.३० चौ. मीटर्सच्या प्रॉपर्टी रजिस्टर कार्डप्रमाणे निव्वळ एरिया (१३५२.०२ चौ. मीटर्सच्या मूळ जमिनीमधून १६९.६२ चौ. मीटर्स आणि १७६.१० चौ. मीटर्स चे बाधीत क्षेत्र वजा केल्यानंतर) (हक्क दस्तावेजांनुसार ११८२.४० चौ. मीटर्स) मोजमापित सीटीएस क्र. ३१-ए/२ शी संलग्न व सर्व्हे क्र. ०६ आणि हिस्सा क्र. ४ धारक जमिनीचा प्लॉट धारक ती सर्व अखंड मिळकत/जमीन आणि खालीलप्रमाणे सीमाबध्द:

पूर्वेस किंवा त्यादिशेने : १३.४० मीटर रुंद सोडावाला लेन/रोड
पश्चिमेस किंवा त्यादिशेने : सीटीएस क्र. ३१-ए/२, 'सहयोग' सीएचएस लि.
उत्तरेस किंवा त्यादिशेने : राज क्रिस्टल सीएचएस लि., रॉयल कॉम्प्लेक्स
दक्षिणेस किंवा त्यादिशेने : १८.३० मीटर रुंद एक्सर रोड

दिनांक: २७ मे, २०२०

एएसडी असोसिएटस्,
(अमित मिश्रा)
भागीदार,
ॲडव्होकेटस् अँड सॉलिसिटर्स

---

राष्ट्रीय कंपनी विधि न्यायाधिकरण
मुंबई न्यायपीठासमोर
**कंपनी योजना याचिका क्र.सी.पी.(सीएए)/८२०/एमबी/२०२०**
**मध्ये**
**कंपनी योजना अर्ज क्र.सी.ए.(सी.ए.ए.) क्र.७९१/एमबी/२०१९**
कंपनी अधिनियम २०१३ च्या प्रकरणी
आणि
कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम २३० ते कलम २३२ आणि अन्य लागू असणाऱ्या तरतुदींच्या प्रकरणी
आणि
बीहाईव्ह एज्युकेशन प्रायव्हेट लिमिटेड (''बीईपीएल'' किंवा ''हस्तांतरिती कंपनी'') यांचे वन एज्युकेशन इनिशिएटिव्हज् प्रायव्हेट लिमिटेड (''ओईआयपीएल'' किंवा ''हस्तांतरिती कंपनी'') आणि त्यांचे प्रत्येकांचे भागधारक यांच्याबरोबर समावेशाद्वारे विलीनीकरणाच्या योजनेच्या (''योजना'') प्रकरणी.

**बीहाईव्ह एज्युकेशन प्रायव्हेट लिमिटेड,** )
ही कंपनी अधिनियम १९५६ च्या तरतुदीअंतर्गत स्थापन झालेली असून )
त्यांचा कॉर्पोरेट आयडेन्टिटी क्र. U80904MH2011PTC212200 असून )
त्यांचे नोंदणीकृत कार्यालय, प्लॉट नं.१५३, सीटीएस नं.१९५/१२३, ) .... **याचिकादार /**
गारोडिया नगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई ४०००७७ येथे स्थित आहे. ) **हस्तांतरणकर्ता कंपनी**

**याचिकेच्या सुनावणीची सूचना**

ज्याअर्थी बीहाईव्ह एज्युकेशन प्रायव्हेट लिमिटेड (''बीईपीएल'' किंवा ''हस्तांतरिती कंपनी'') यांचे वन एज्युकेशन इनिशिएटिव्हज् प्रायव्हेट लिमिटेड (''ओईआयपीएल'' किंवा ''हस्तांतरिती कंपनी'') आणि त्यांचे प्रत्येकांचे भागधारक यांच्याबरोबर समावेशाद्वारे विलीनीकरणाच्या योजनेस (''योजना'') राष्ट्रीय विधि न्यायाधिकरण, मुंबई न्यायपीठाच्या (''एनसीएलटी'') मंजूरीसाठी विषयांकित याचिका दिनांक ५ मार्च २०२० रोजी दाखल करण्यात आली आहे.

याद्वारे सूचना देण्यात येते की, एनसीएलटी यांनी दिनांक ११ मे २०२० रोजी पारित केलेल्या आदेशाद्वारे (''आदेश''), सदर याचिका एनसीएलटी यांनी दाखल करुन घेतली होती आणि कंपनी (तडजोडी, व्यवस्था आणि विलीनीकरणे) नियम २०१६ च्या नियम १६ तसेच सदर आदेशामध्ये दिलेल्या निर्देशानुसार विषयांकित याचिका एनसीएलटी यांच्यासमोर दिनांक ९ जून २०२० रोजी नियोजित करण्यात आली आहे.

कोणत्याही व्यक्तीस याचिकेस समर्थन किंवा विरोध करावयाचा असल्यास त्यांनी त्यांच्या उद्द्देशांची, त्यांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधीने स्वाक्षरित केलेली याचिका त्यांचे नाव व पत्त्यासह, याचिकादार कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात किंवा अधिकृत प्रतिनिधी यांच्या कार्यालयात खाली नमूद केलेल्या पत्त्यावर, याचिकेसाठी निश्चित केलेल्या दिनांकापूर्वी कमीत कमी सात दिवस आधी मिळेल अशा रितीने पाठवावी. याचिकेस विरोध करावयाचा असल्यास विरोधाची पार्श्वभूमी किंवा त्यांच्या प्रतिज्ञापत्राची प्रत अशा सूचनेबरोबर पाठवावी.

याचिकेच्या प्रतीसाठी विहित शुल्क भरल्यास ती याचिकादार कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातून घेता येईल. मुंबई येथे दिनांक २७ मे २०२० रोजी.

**बीहाईव्ह एज्युकेशन प्रायव्हेट लिमिटेड करिता आणि वतीने**
**स्वाक्षरी/—**
**निलेश शाह ॲण्ड असोसिएट्स**
प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरीज / याचिकादार यांचे विधीसल्लागार
२११, बिल्डींग नं.१, सोना उद्योग इंडस्ट्रीयल इस्टेट, परसी पंचायत रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००६९
Email : ngshah.cs@gmail.com

---

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**ई-निविदा सूचना क्र.१०/२०२० साठी मुदतवाढ**

दि. १९.०३.२०२० रोजी **दै. नवशक्ति, मुंबई** वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या **निविदा सूचना क्र. १० सन २०२० मधील खालील कामांसाठी ई-निविदा** उपलब्ध होण्याचा कालावधी तांत्रिक कारणास्तव खालीलप्रमाणे वाढविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | रांजणगाव औद्योगिक क्षेत्र...सांडपाणी योजना... देखभाल व दुरुस्ती... सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे कार्यवहन व वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे. | रु. २८,२१,४५०/- |
| २ | रांजणगाव औद्योगिक क्षेत्र...ड्रेनेज डिस्पोजल स्कीम...देखभाल व दुरुस्ती... सांडपाणी उदंचन केंद्राची वार्षिक कार्यवहन व देखभाल दुरुस्ती करणे. | रु. २९,७६,५७५/- |
| ३ | अहमदनगर औद्योगिक क्षेत्र... अहमदनगर एकत्रित पाणीपुरवठा योजना...देखभाल व दुरुस्ती... १००० मिमी व्यासाच्या उर्ध्वजलवाहिनीची तसेच एम.ई.एस. ला जाणाऱ्या जलवाहिनीची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे व इतर कामे करणे. | रु. ३८,२५,५३६/- |
| ४ | बारामती औद्योगिक क्षेत्र...अनिवासी इमारत देखभाल व दुरुस्ती...अग्निशमन केंद्र देखभाल व दुरुस्ती, पाणीपुरवठा देखभाल व दुरुस्ती... गेस्ट हाऊस, पाणी प्रक्रिया केंद्र तसेच अग्निशमन केंद्र परिसरातील जुन्या रोडला रि आस्फाल्टींग करणे. | रु. ४१३५८३७/- |
| ५ | बारामती औद्योगिक क्षेत्र...पाणीपुरवठा देखभाल व दुरस्ती...पाणी प्रक्रिया केंद्र बारामती येथे क्लोरीन डाय ऑक्साईडची मात्रा देणे. | रु. ४१,६८,८९२/- |
| ६ | पिंपरी चिंचवड औद्योगिक क्षेत्र...निवास, अनिवासी इमारत व पिंपरी चिंचवड औद्योगिक क्षेत्रातील विविध ठिकाणच्या पाणीपुरवठा योजना...देखभाल व दुरुस्ती... विद्युतीय सर्वसमावेशक वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे व इतर अनुषंगिक कामे करणे. (दोन वर्षांकरिता) | रु. ४२,४७,८४२/- |
| ७ | पिंपरी चिंचवड औद्योगिक क्षेत्र जलशुद्धीकरण केंद्रातील उदंचनगृह व जॅकवेल येथील उदंचनगृह व शुद्ध पाणीपुरवठा चॅनेलला नॉर्डबॅकचा मुलामा देणे, फिल्टर इन्लेट यंत्रणेमध्ये सुधारणा करणे तसेच जलशुद्धीकरण केंद्र येथील इतर यांत्रिकी विषयक कामे करणे. | रु. ३,८६,५८,६७१/- |
| ८ | चाकण (२) औद्योगिक क्षेत्र... चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. २ येथील ए व बी ब्लॉक, सी, डी व ई ब्लॉक तसेच चाकण टप्पा क्र. ४ येथील पवार चौकातून महिंद्रा आर. ॲण्ड डी. कडे जाणाऱ्या नवीन रस्त्यावरील पथदिवे एक वर्षांचा डिफेक्ट लायबिलिटी संपल्यानंतर पाच वर्षांच्या सर्वसमावेशक देखभाल व दुरुस्तीसह पुरविणे, बसविणे व कार्यान्वित करणे. | रु. ४,९२,६०,१२२/- |

वरील कामांची कोरी ई-निविदा महामंडळाच्या (**www.midcindia.org**) संकेतस्थळावर उपलब्ध होण्याचा कालावधी **दिनांक ०३.०६.२०२०** पर्यंत वाढविण्यात आलेला आहे. या व्यतिरिक्त निविदा सूचनेमधील इतर बाबीमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

---

## पश्चिम रेल्वे

**विविध विद्युत कोचिंग कामे**

**अनु.क्र.१. निविदा क्र.: ईएल ५/२/१/४४/सीएचजी/डब्ल्यूए/१० दि. २६/०५/२०२०. कामाचे नाव:** पीओएच शॉप, मुंबई सेंट्रल येथे ५ टन क्षमतेच्या होईस्टचे मॅन्युअल ते पूर्णपणे इलेक्ट्रिक मोटारीवर चालणाऱ्या होईस्ट च्या रूपात बदल करणे, चाचणी, कार्यान्वयन. **कामाची अंदाजीत कीमत:** ₹ १६,७०,२१९/-. **इरठे:** ₹ ३३,४००/-. **जमा करण्याची तारीख आणि वेळ:** २६/०६/२०२० रोजी १५.०० वाजताच्या आधी. **उघडण्याची तारीख आणि वेळ:** २६/०६/२०२० रोजी १५.३० वा. उघडण्यात येईल. **अनु.क्र.२. निविदा क्र.: ईएल ५/२/१/६२/सीएचजी/ डब्ल्यूए/११ दि. २६/०५/२०२०. कामाचे नाव:** एलएचबी प्रकारच्या एसी कोचसाठी केंद्रीयकृत कोच मॉनिटरिंग सिस्टमचा विकास, पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कार्यान्वयन. **कामाची अंदाजीत कीमत:** ₹ २,८७,६२,५००/- **इरठे:** ₹ २,९३,८००/-, **जमा करण्याची तारीख आणि वेळ:** २६/०६/२०२० रोजी १५.०० वाजताच्या आधी. **उघडण्याची तारीख आणि वेळ:** २६/०६/२०२० रोजी १५.३० वा. उघडण्यात येईल. **नोंद :** कृपया निविदा कागदपत्रे, शुध्दीपत्रक आणि पुढील तपशील डाउनलोड करण्यासाठी आमच्या **www.ireps.gov.in** या संकेतस्थळाला भेट द्या.

आम्हाला लाइक करा: facebook.com/WesternRly

---

KKCL Making growth fashionable
KEWAL KIRAN CLOTHING LIMITED

**कॉर्पोरेट आयडेन्टिटी नंबर-** एल१८१०१एमएच१९९२पीएलसी०६५१३६
**नोंद. कार्यालय:** केवल किरण इस्टेट, ४६०/७, आय. बी. पटेल रोड, तिरुपती उद्योग मागे, गोरेगाव (पू), मुंबई-४०००६३.
**दू. क्र.:** ०२२-२६८१४४०० । **फॅक्स क्र.:** ०२२ २६८१४४१०
**वेबसाईट:** www.kewalkiran.com । **ईमेल आयडी:** grievanceredressal@kewalkiran.com

## सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक मंगळवार, २६ मे, २०२० रोजी झाली आणि संचालक मंडळाने आर्थिक वर्ष २०१९-२० साठी प्रति भाग रु. ६/- म्हणजेच ६०% च्या ४ था अंतरिम लाभांशाची घोषणा केली.

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ९१ ला अनुसरून याद्वारे ही सूचना देखील देण्यांत येते की, अंतरिम लाभांशाकरिता हक्कदार सभासदांनी पात्रता ठरविण्याकरिता रेकॉर्ड डेट आहे शुक्रवार, ५ जून, २०२०.

हया सूचने मधील माहिती कंपनीची वेबसाईट www.kewalkiran.com वर आणि कंपनीचे शेअर्स जेथे सूचिबध्द आहेत त्या स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाईटस www.bseindia.com व www.nseindia.com वर सुध्दा उपलब्ध आहे.

प्रत्यक्ष पध्दतीने धारण केलेल्या शेअर्सच्या संबंधात कंपनीच्या रजिस्ट्रार अँड शेअर ट्रान्सफर एजंटस ना आणि इलेक्ट्रॉनिक पध्दतीने धारण केलेल्या शेअर्सच्या संबंधात त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंटसना सभासदांनी कृपया त्यांचे बँक खाते तपशील, पत्त्यातील बदल इ. कळवावे.

**रजिस्ट्रार अँड शेअर ट्रान्सफर एजंटस**
लिंक इनटाईम इंडिया प्रा. लिमिटेड
सी-१०१, २४७ पार्क, एल. बी. एस. मार्ग,
विक्रोळी (पश्चिम), मुंबई-४०००८३.

**सचांलक मंडळाच्या आदेशावरुन**
**केवल किरण क्लोदींग लिमिटेड साठी**
**सही/-**
**अभिजित वारंगे**
**कंपनी सेक्रेटरी**

**दिनांक:** २७ मे, २०२०
**ठिकाण:** मुंबई

---

राष्ट्रीय कंपनी विधि न्यायाधिकरण
मुंबई न्यायपीठासमोर
**कंपनी योजना याचिका क्र.सी.पी.(सीएए)/८९७/एमबी/२०२०**
**मध्ये**
**कंपनी योजना अर्ज क्र.सी.ए.(सी.ए.ए.) क्र.७९२/एमबी/२०१९**
कंपनी अधिनियम २०१३ च्या प्रकरणी
आणि
कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम २३० ते कलम २३२ आणि अन्य लागू असणाऱ्या तरतुदींच्या प्रकरणी
आणि
बीहाईव्ह एज्युकेशन प्रायव्हेट लिमिटेड (''बीईपीएल'' किंवा ''हस्तांतरिती कंपनी'') यांचे वन एज्युकेशन इनिशिएटिव्हज् प्रायव्हेट लिमिटेड (''ओईआयपीएल'' किंवा ''हस्तांतरिती कंपनी'') आणि त्यांचे प्रत्येकांचे भागधारक यांच्याबरोबर समावेशाद्वारे विलीनीकरणाच्या योजनेच्या (''योजना'') प्रकरणी.

**वन एज्युकेशन इनिशिएटिव्हज् प्रायव्हेट लिमिटेड,** )
ही कंपनी अधिनियम १९५६ च्या तरतुदीअंतर्गत स्थापन झालेली असून )
त्यांचा कॉर्पोरेट आयडेन्टिटी क्र. U80904MH2010PTC206751 असून )
त्यांचे नोंदणीकृत कार्यालय, प्लॉट नं.१५३, गारोडिया नगर, ) .... **याचिकादार /**
घाटकोपर (पूर्व), मुंबई ४०००७७ येथे स्थित आहे. ) **हस्तांतरिती कंपनी**

**याचिकेच्या सुनावणीची सूचना**

ज्याअर्थी बीहाईव्ह एज्युकेशन प्रायव्हेट लिमिटेड (''बीईपीएल'' किंवा ''हस्तांतरिती कंपनी'') यांचे वन एज्युकेशन इनिशिएटिव्हज् प्रायव्हेट लिमिटेड (''ओईआयपीएल'' किंवा ''हस्तांतरिती कंपनी'') आणि त्यांचे प्रत्येकांचे भागधारक यांच्याबरोबर समावेशाद्वारे विलीनीकरणाच्या योजनेस (''योजना'') राष्ट्रीय विधि न्यायाधिकरण, मुंबई न्यायपीठाच्या (''एनसीएलटी'') मंजूरीसाठी विषयांकित याचिका दिनांक ५ मार्च २०२० रोजी दाखल करण्यात आली आहे.

याद्वारे सूचना देण्यात येते की, एनसीएलटी यांनी दिनांक ११ मे २०२० रोजी पारित केलेल्या आदेशाद्वारे (''आदेश''), सदर याचिका एनसीएलटी यांनी दाखल करुन घेतली होती आणि कंपनी (तडजोडी, व्यवस्था आणि विलीनीकरणे) नियम २०१६ च्या नियम १६ तसेच सदर आदेशामध्ये दिलेल्या निर्देशानुसार विषयांकित याचिका एनसीएलटी यांच्यासमोर दिनांक ९ जून २०२० रोजी नियोजित करण्यात आली आहे.

कोणत्याही व्यक्तीस याचिकेस समर्थन किंवा विरोध करावयाचा असल्यास त्यांनी त्यांच्या उद्द्देशांची, त्यांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधीने स्वाक्षरित केलेली याचिका त्यांचे नांव व पत्त्यासह, याचिकादार कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात किंवा अधिकृत प्रतिनिधी यांच्या कार्यालयात खाली नमूद केलेल्या पत्त्यावर, याचिकेसाठी निश्चित केलेल्या दिनांकापूर्वी कमीत कमी सात दिवस आधी मिळेल अशा रितीने पाठवावी. याचिकेस विरोध करावयाचा असल्यास विरोधाची पार्श्वभूमी किंवा त्यांच्या प्रतिज्ञापत्राची प्रत अशा सूचनेबरोबरर पाठवावी.

याचिकेच्या प्रतीसाठी विहित शुल्क भरल्यास ती याचिकादार कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातून घेता येईल. मुंबई येथे दिनांक २७ मे २०२० रोजी.

**वन एज्युकेशन इनिशिएटिव्हज् प्रायव्हेट लिमिटेड करिता आणि वतीने**
**स्वाक्षरी/—**
**निलेश शाह ॲण्ड असोसिएट्स**
प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरीज / याचिकादार यांचे विधीसल्लागार
२११, बिल्डींग नं.१, सोना उद्योग इंडस्ट्रीयल इस्टेट, परसी पंचायत रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००६९
Email : ngshah.cs@gmail.com

---

## ग्रीव्हज कॉटन लिमिटेड

GREAVES SINCE 1859

**कॉर्पोरेट आयडेन्टीटी नंबर:** एल९९९९९एमएच१९२२पीएलसी०००९८७
**नोंदणीकृत कार्यालय:** युनिट क्र. ७०१, ७वा मजला, टॉवर ३, इक्विनॉक्स बिझिनेस पार्क, एलबीएस मार्ग, कुर्ला (प.) मुंबई - ४०० ०७०. **दूरध्वनी:** +९१ - २२ - ६२२११७००; **फॅक्स:** +९१ - २२ - ६२२१७४९९
**ईमेल:** investorservices@greavescotton.com; **वेबसाइट:** www.greavescotton.com

**भागधारकांना सूचना**

कंपनीच्या समभागांचे गुंतवणूकदारांच्या डिमॅट खात्यात कंपनी शिक्षण व संरक्षण निधी (आयईपीएफ) मध्ये प्राधिकरण

कंपनी अधिनियम, २०१३ चे कलम १२४ (६) च्या तरतुदी तसेच गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी (आयईपीएफ) प्राधिकरण (लेखांकन, लेखापरीक्षण, हस्तांतरण व परतावा) नियम २०१६, वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे ('नियम'), यांच्या तरतुदींच्या संदर्भात, सर्व शेअर्स हे, ज्यांच्याकरिता सलग सात वर्षांच्या कालावधीसाठी भागधारकांना लाभांश मिळालेला नाही किंवा भागधारकांद्वारे दावा करण्यात आलेला नाही, आयईपीएफ प्राधिकरणाच्या डीमॅट खात्यामध्ये जमा करण्यात येतील.

अंतिम वर्ष २०१२-१३ वित्तीय वर्षासाठी अंतिम लाभांशावर दावा करण्यासाठीची नियत दिनांक १ सप्टेंबर २०२० अशी आहे. सदर नियमांचे अनुपालन करून आणि कोव्हिड-१९ च्या लॉकडाउनच्या स्थितीमुळे, कंपनीकडे ज्या भागधारकांचे ईमेल आयडीज नोंदणीकृत आहेत, ज्यांचे शेअर्स सदर नियमांप्रमाणे आयईपीएफ खात्यामध्ये हस्तांतरीत करण्यासाठी पात्र आहेत, त्यांनी करावयाच्या आवश्यक कृतीविषयी आणि प्रदान न केलेल्या (अनपेड) लाभांशावर दावा करण्यासाठी सादर करावयाच्या दस्तऐवजांविषयी कळवण्याकरिता भागधारकांना कंपनीने केवळ ईमेल संपर्क केलेला आहे, सदरबाबत कृती करण्यास असमर्थ ठरल्यास त्यांचे शेअर्स आयईपीएफ खात्यामध्ये हस्तांतरीत करण्यात येतील. सदर माहिती कंपनीच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

भागधारकांना सदर दस्तऐवजामध्ये उल्लेख करण्यात आलेले आवश्यक दस्तऐवज हे कंपनीच्या वेबसाइटवर investorservices@greavescotton.com येथे किंवा कंपनीच्या रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफर एजन्टला einward.ris@kfintech.com येथे शक्यतो २० ऑगस्ट २०२० पर्यंत पाठवण्याची विनंती करण्यात येत आहे. भागधारकाकडून वैध दावा प्राप्त न झाल्यास, सदर नियमांच्या आवश्यकतेनुसार, कंपनी पुढील कोणत्याही सूचनेशिवाय आयईपीएफ खात्यामध्ये सदर शेअर्ससह लाभांश हस्तांतरित करेल.

ज्या भागधारकांचे शेअर्स हे आयईपीएफ प्राधिकरणाच्या डीमॅट खात्यामध्ये हस्तांतरीत करण्यासाठी पात्र आहेत, त्या भागधारकांचा पूर्ण तपशील कंपनीच्या www.greavescotton.com या वेबसाइटवर कंपनीने अपलोड केलेला आहे.

कृपया हे लक्षात घ्यावे की दावा न केलेल्या डिविडंडच्या रकमेसाठी आणि सदर नियमांनुसार आयईपीएफ खात्यात हस्तांतरीत केलेल्या भागांसाठी कंपनीविरुध्द कोणताही दावा उरणार नाही. कृपया याचीही नोंद घ्यावी की अशा हस्तांतरणानंतर, भागधारक हस्तांतरीत भागांवर त्यावरील लाभांशांसह आयईपीएफ खात्यातून दावा करू शकतात, ज्यासाठी तपशील www.iepf.gov.in वर उपलब्ध आहे.

या विषयावरील कोणत्याही माहितीसाठी/स्पष्टीकरणासाठी, संबंधित भागधारक कंपनीला investorservices@greavescotton.com वर लिहू शकतील किंवा कंपनीचे रजिस्ट्रार अँड ट्रान्सफर एजंट यांना केफिन टेक्नोलॉजिस प्रायवेट लिमिटेड यांच्याशी, ''कार्वी सेलेनियम टॉवर बी'' प्लॉट क्र. ३१ आणि ३२, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानाक्रमगुडा, गाचीबोवली, हैद्राबाद-५०० ०३२. टोल फ्री क्रमांक: १८००३४५४००१ ईमेल: einward.ris@kfintech.com येथे संपर्क साधू शकतील.

कृपया नोंद घ्या की कोव्हिड-१९ च्या महामारी सद्य स्थितीमुळे, कंपनीने संबंधित भागधारकांना ही नोटीस कंपनीकडे नोंदणीकृत असणाऱ्या ईमेलद्वारे पाठवलेली आहे. ज्या भागधारकांचे ईमेल आयडीज कंपनीकडे नोंदणीकृत नाहीत त्यांच्यासाठी टपाल/कुरिअर पुन्हा सुरू केल्यावर सूचनेच्या भौतिक प्रती त्वरित पाठवण्यात येतील.

ग्रीव्हज कॉटन लिमिटेडसाठी
सही/-
अतींद्र बासु
मुख्य - कायदेविषयक, अंतर्गत लेखापरिक्षक आणि कंपनी सचिव

मुंबई
२६ मे, २०२०

---

## नाशिक महानगरपालिका, नाशिक
### विद्युत व यांत्रिकी विभाग
### जाहिर ई-निविदा सुचना क्र. ०५ (सन २०२०-२१)

नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचेकडून विद्युत विभागाकरिता खालील नमुद कामांकरीता जाहिर ई- टेंडर पध्दतीने B-1 प्रकारात निविदा मागविणेत येत आहे.

१. नविन नाशिक विभागातील विविध ठिकाणचे तुटलेले पोल बॉक्स बदलणे व अनुषंगिक कामे करणे.
२. नाशिक पुर्व विभागातील क्रिडांगणामधील पोलवर फ्लड लाईटची व्यवस्था करणे.
३. नाशिक पश्चिम विभागातील विविध ठिकाणच्या जॉगींग ट्रकवरील म्युझीक सिस्टीमच्या वार्षीक देखभाल व दुरुस्ती करणे.

सविस्तर निविदा सुचना मनपाच्या website **https://nashikcorporation.in** वर **दि. ०१/०६/२०२० ते १५/०६/२०२०** रोजी उपलब्ध आहे.

निविदा फॉर्मच्या कोऱ्या निविदा संचाची विक्री व विस्तृत तपशील **https://mahatenders.gov.in** या संकेत स्थळावर **दि. ०१/०६/२०२० ते १५/०६/२०२०** रोजी पर्यंत पाहावयास मिळतील.

सही/-
कार्यकारी अभियंता (विद्युत)
नाशिक महानगरपालिका, नाशिक

ज.सं./जा.क्र./८१/ दि. २६/०५/२०२०
सामायिक अंतर राखा...! कोरोनाचा प्रादुर्भाव टाळा...!

---

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**ई-निविदा सूचना क्र.०९/२०२० साठी मुदतवाढ**

दि. १२.०३.२०२० रोजी दै. नवशक्ति, मुंबई वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या निविदा सूचना क्र. ०९ सन २०२० मधील खालील कामांसाठी ई-निविदा उपलब्ध होण्याचा कालावधी तांत्रिक कारणास्तव खालीलप्रमाणे वाढविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | तळेगाव औद्योगिक क्षेत्र...फायर स्टेशन तळेगाव... अनिवासी इमारत...देखभाल व दुरुस्ती...तळेगाव अग्निशमन केंद्र, तळेगाव येथे वातानुकुलित यंत्रणा, जनित्र पुरविणे, बसविणे व कार्यान्वित करणे तसेच इतर विद्युतीय कामे करणे. (दुसरी मागणी) | रु. १३,१३,६८८/- |
| २ | पिंपरी चिंचवड निवासी... अनिवासी इमारत व पाणी पुरवठा योजना देखभाल व दुरुस्ती... पिंपरी चिंचवड औद्योगिक क्षेत्र... मऔविमच्या विविध कार्यालयामध्ये बसविण्यास आलेले जुने युपीएस व बॅटरी बदलणे तसेच विविध क्षमतेच्या ऑनलाईन युपीएसची वार्षिक दोन वर्षाच्या कालावधीकरिता देखभाल व दुरुस्ती करणे. | रु. २६,८८,२४१/- |
| ३ | तळेगाव औद्योगिक क्षेत्र...पाणी पुरवठा योजना... देखभाल व दुरुस्ती... नवीन पाणी पुरवठा योजनेचे कार्यवहनाकरिता वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे. | रु. ३२,३९,०१६/- |
| ४ | पिंपरी चिंचवड औद्योगिक क्षेत्र...पाणी पुरवठा योजना... देखभाल व दुरुस्ती... उदंचन गृह जलशुद्धीकरण केंद्र परिसरातील शुद्ध व अशुद्ध पाणीपुरवठा उर्ध्वजल वाहिन्यांची दोन वर्षाकरिता गळती थांबविणे व देखभाल दुरुस्ती करणे | रु. ३५,२२,१६४/- |
| ५ | रांजणगाव (विकास केंद्र) औद्योगिक क्षेत्र...पाणी पुरवठा योजना... देखभाल व दुरुस्ती... जलशुद्धीकरणे केंद्राची तसेच शुद्ध पाणीपुरवठा वितरकांची वार्षिक तत्त्वावर देखभाल व दुरुस्ती करणे. | रु. ३५,४३,७८५/- |

वरील कामांची कोरी ई-निविदा महामंडळाच्या (**www.midcindia.org**) संकेतस्थळावर उपलब्ध होण्याचा कालावधी दिनांक ०२.०६.२०२० पर्यंत वाढविण्यात आलेला आहे. या व्यतिरिक्त निविदा सूचनेमधील इतर बाबीमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

---

## टाटा कॅपिटल फायनान्शीअल सर्व्हिसेस लिमिटेड

TATA
नों. कार्यालय: ११ वा मजला, टॉवर ए, पेनिन्सुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परळ, मुंबई – ४०० ०१३.

### मागणी सूचना

**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीअल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (''ॲक्ट'') च्या कलम १३(२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ (''रुल्स'') च्या नियम ३ अन्वये.**

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकारांनी टाटा कॅपिटल फायनान्शीअल सर्व्हिसेस लिमिटेड (टीसीएफएसएल) चे प्राधिकृत अधिकारी हया नात्याने ॲक्ट अन्वये आणि कलम १३(१२) सह वाचता रुल्स च्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून आधीच ॲक्टच्या कलम १३(२) अन्वये खालील दिनांकीत तपशीलवार मागणी सूचना जारी करून कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदार/गहाणकार (सर्वांचा वैयक्तिक किंवा एकत्रित खाली सूचिबध्द केलेले ''कर्जदार'' असा उल्लेख) यांना खालील तपशीलानुसार संबंधित मागणी सूचनेतील रक्कम सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांत प्रदान करण्यास सांगितले होते.

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ नुसार सदर कर्जदारांवर मागणी सूचनेची ई-मेल बजावणी केली आहे आणि सूचनेच्या प्रती निम्नस्वाक्षरीकारांकडे उपलब्ध आहेत आणि कर्जदारांची इच्छा असल्यास, कोणत्याही कामाच्या दिवशी (सोमवार ते शुक्रवार) स. १०.०० ते सं. ४.०० दरम्यान निम्नस्वाक्षरीकारांकडून संबंधित प्रत प्राप्त करू शकतात.

वरील संबंधात, याद्वारे पुन्हा एकदा सूचना देऊन सदर कर्जदारांना सदर कर्जदारांनी केलेल्या कर्ज करार व केले असल्यास अन्य दस्तावेज/लिखापठीसह वाचत रकाना (डी) मध्ये खाली वर्णन केलेल्या संबंधित तारखांपासून प्रदानाच्या आणि/किंवा वसुलीच्या तारखेपर्यंत पुढील व्याजासह एकत्रितपणे त्यांच्या संबंधित नावांसमोर येथे खाली दाखवलेली रक्कम सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांत टीसीएफएसएल ला प्रदान करण्यास सांगण्यांत येते. कर्जाच्या रितसर परतफेडीसाठी तारण म्हणून संबंधित सदर कर्जदारांनी टीसीएफएसएल कडे खालील तारण मत्ता गहाण ठेवल्या आहेत.

| कर्ज खाते क्र. (ए) | कर्जदार/कायदेशीर वारस/ कायदेशीर प्रतिनिधीचे नाव (बी) | खालील तारखेरोजीस एकूण देय थकबाकी* (रु.)* (सी) | मागणी सूचना तारीख आणि एनपीएची तारीख (डी) |
|---|---|---|---|
| डब्ल्युसीडी ०१७३ | १. मे. प्रियांका कम्युनिकेशन्स (इंडिया) प्रा. लि. (कर्जदार/गहाणकार) २. श्री. महेशचंद्र अगरवाल (गहाणकार/जामीनदार) ३. श्री. मनिषचंद्र अगरवाल (गहाणकार/जामीनदार) | १ मार्च, २०२० रोजीस रु. ३२,२२,४५,६७९.२६/- (रुपये बत्तीस कोटी बावीस लाख पंचेचाळीस हजार सहाशे एकोणऐंशी व पैसे सव्वीस मात्र) | अनुक्रमे २२ मे, २०२० आणि २९ फेब्रुवारी, २०२० |

**तारण मत्ता/स्थावर मिळकती/गहाण मिळकतींचे वर्णन (ई):** (येथील परिशिष्ट ए मध्ये सविस्तर वर्णन केले आहे)

* प्रदानाच्या आणि/किंवा वसुलीच्या तारखेपर्यंत पुढील व्याज, उपरोक्त दिनांकीत मागणी सूचनेत सविस्तर वर्णन केलेल्या दराने अतिरिक्त व्याज, आलेले अनुषंगिक परिव्यय, खर्च, आकार इ. सह. जर सदर कर्जदारांनी वरीलप्रमाणे टीसीएफएसएल ला प्रदान करण्यांत कसूर केली तर टीसीएफएसएल इतर संघीय धनकोंसह, खर्च आणि परिणामांसाठी सर्वस्वी सदर कर्जदार/कायदेशीर वारस/कायदेशीर प्रतिनिधी यांच्या जोखीमीवर सदर ॲक्टच्या कलम १३(४) व प्रयोज्य नियमांन्वये वरील तारण मत्ता/स्थावर मिळकतींविरुध्द कारवाई करेल.

सदर ॲक्ट अन्वये सदर कर्जदार/कायदेशीर वारस/कायदेशीर प्रतिनिधी यांना टीसीएफएसएल च्या लेखी पूर्व परवानगीशिवाय विक्री, भाडेपट्टा किं अन्य प्रकारे उपरोक्त तारण मत्ता/स्थावर मिळकतींचे हस्तांतरण करण्यास प्रतिबंध केला आहे. ॲक्ट किंवा त्या अंतर्गत बनवलेले रुल्स यांच्या तरतुदींचे कोणत्याही व्यक्तीने उल्लंघन केल्यास किंवा प्रयत्न केल्यास ॲक्ट मधील तरतुदींनुसार ते कारावास आणि/किंवा दंडास पात्र ठरतील.

**परिशिष्ट – ए**

**ए. प्राथमिक तारण:** प्रेषिती क्र. १ च्या जंगम गहाणाच्या स्वरुपात पहिला सप्रमाण भार – संपूर्ण चालू मत्ता म्हणजेच कच्च्या मालाचा साठा, अर्ध तयार व तयार माल, प्लांट व मशिनरी शी संबंधित नसलेले स्टोर्स आणि स्पेअर्स (कंझ्युमेबल स्टोर्स आणि स्पेअर्स), येणे बील्स व पुस्तकी कर्जे आणि सदर बँकांना स्वीकार्य असलेल्या स्वरुपातील व तशा पध्दतीने वेळोवेळी सदर बँकांकडून संमत केले जाईल अशा जंगम मत्ता वगळून सध्याच्या तसेच भविष्यातील कर्जदारांच्या अन्य सर्व जंगम मत्ता.

खाली वर्णन केलेल्या गोडाऊन मध्ये पडून असलेल्या जंगमगहाण मालाच्या ठिकाणांचे तपशील गोडाऊन्सची सूची खालीलप्रमाणे:

१. १४२ आणि १४३, ओशिवरा इंडस्ट्रीयल सेंटर, ओशिवरा बस डेपो समोर, न्यू लिंक रोड, गोरेगाव (प), मुंबई-४००१०४.
२. टीव्हीएस सप्लाय चेन सोल्युशन्स लिमिटेड (पूर्वीचे नाव टीव्हीएस लॉजिस्टीक्स सर्व्हिसेस लि.) मे. देवकर अँड चोंढे असोसिएटस्, गट क्र. २३९, गाव वाढु खुर्द, लोणीकंद आळंद रोड, तालुका हवेली, पुणे, महाराष्ट्र-४१२०२३.
३. टीव्हीएस सप्लाय चेन सोल्युशन्स लिमिटेड, वैभव वेअरहाऊस, ३७१/१, विक्रम उद्योग, विहार मेनाबार रोड, पालडा, इंदोर, मध्य प्रदेश, पिन कोड-४५२०२०.

**बी. सांपार्श्विक तारण:**

खाली वर्णन केलेल्या स्थावर मिळकतींच्या गहाणाच्या स्वरुपात पहिला सप्रमाण भार. श्री. महेश चंद्र अगरवाल (फ्लॅट क्र. ११०१) आणि श्री. मनिष अगरवाल (फ्लॅट क्र. ११०२) च्या मालकीचे मुंबई शहर आणि उपनगर च्या नोंदणी जिल्हा आणि उप. नोंदणी जिल्ह्यातील स. क्र. ४१ (भाग), प्लॉट क्र. ३२५, ओशिवरा, लोखंडवाला कॉम्प्लेक्स, अंधेरी पश्चिम, मुंबई-४०० ०५३, गाव ओशिवरा, तालुका अंधेरी येथील ग्रीन एकर्स सीएचएस लि. च्या ग्रीन एकर्स नावाच्या इमारतीच्या ११ व्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ११०१ व ११०२ (एकत्र जोडलेले – एकूण कार्पेट एरिया १४६८ चौ. फूट, व्हॅल्युएशन रिपोर्टनुसार)

ii) कर्जदारांच्या मालकीचे मुंबई शहर आणि उपनगरच्या नोंदणी आणि उपनोंदणी जिल्हयातील गाव पहाडी, तालुका बोरिवली येथील प्लॉट क्र. डी/११, सर्व्हे क्र. १६१(भाग), सी.टी. एस. क्र. १-ए धारक जमिनीच्या प्लॉटवर बांधलेल्या ओशिवरा इंडस्ट्रीयल सेंटर, ओशिवरा बस डेपो समोर, न्यू लिंक रोड, गोरेगाव पश्चिम, मुंबई-४००१०४ येथील बी विंग मधील तळ मजल्यावरील प्रत्येकी ६०५ चौ. फूट सुपर बिल्ट अप एरिया मोजमापित (व्हॅल्युएशन रिपोर्ट नुसार) युनिट क्र. ४४ आणि ४६ (एकत्रित).

iii) कर्जदारांच्या मालकीचे मुंबई शहर आणि उपनगरच्या नोंदणी आणि उपनोंदणी जिल्हयातील गाव पहाडी, तालुका बोरिवली येथील प्लॉट क्र. डी/११, सर्व्हे क्र. १६१(भाग), सी.टी. एस. क्र. १-ए धारक जमिनीच्या प्लॉटवर बांधलेल्या ओशिवरा इंडस्ट्रीयल सेंटर, ओशिवरा बस डेपो समोर, न्यू लिंक रोड, गोरेगाव पश्चिम, मुंबई-४००१०४ येथील बी विंग मधील तळ मजल्यावरील ६०५ चौ. फूट सुपर बिल्ट अप एरिया मोजमापित (व्हॅल्युएशन रिपोर्ट नुसार) युनिट क्र. ४७.

iv) कर्जदारांच्या मालकीचे मुंबई शहर आणि उपनगरच्या नोंदणी आणि उपनोंदणी जिल्हयातील गाव पहाडी, तालुका बोरिवली येथील प्लॉट क्र. डी/११, सर्व्हे क्र. १६१(भाग), सी.टी. एस. क्र. १-ए धारक जमिनीच्या प्लॉटवर बांधलेल्या ओशिवरा इंडस्ट्रीयल सेंटर, ओशिवरा बस डेपो समोर, न्यू लिंक रोड, गोरेगाव पश्चिम, मुंबई-४००१०४ येथील बी विंग मधील पहिल्या मजल्यावरील प्रत्येकी ६०५ चौ. फूट सुपर बिल्ट अप एरिया मोजमापित (व्हॅल्युएशन रिपोर्ट नुसार) युनिट क्र. १४२ व १४३ (एकत्रित).

v) कर्जदारांच्या मालकीचे मुंबई शहर आणि उपनगरच्या नोंदणी आणि उपनोंदणी जिल्हयातील गाव पहाडी, तालुका बोरिवली येथील प्लॉट क्र. डी/११, सर्व्हे क्र. १६१(भाग), सी.टी. एस. क्र. १-ए धारक जमिनीच्या प्लॉटवर बांधलेल्या ओशिवरा इंडस्ट्रीयल सेंटर, ओशिवरा बस डेपो समोर, न्यू लिंक रोड, गोरेगाव पश्चिम, मुंबई-४००१०४ येथील बी विंग मधील पहिल्या मजल्यावरील प्रत्येकी ६०५ चौ. फूट सुपर बिल्ट अप एरिया मोजमापित (व्हॅल्युएशन रिपोर्ट नुसार) युनिट क्र. १४६ व १४८ (एकत्रित).

vi) कर्जदारांच्या मालकीचे मुंबई शहर आणि उपनगरच्या नोंदणी जिल्हा आणि नोंदणी उप-जिल्हयातील गाव आंबिवली, ऑफ वर्सोवा रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई, तालुका अंधेरी येथे स्थित गाव आंबिवली च्या सीटीएस क्र. ८४४/१५/बी धारक सब-प्लॉट क्र. १५ धारक जमिनीच्या प्लॉटवर बांधलेल्या रहेजा प्लाझा नावाच्या इमारती मधील ५ व्या मजल्यावरील प्रत्येकी ६२१ चौ. फूट बिल्ट अप एरिया मोजमापित (व्हॅल्युएशन रिपोर्ट नुसार) युनिट क्र. ५१२ आणि ५१३.

vii) श्री. महेश चंद्र अगरवाल यांच्या मालकीचे बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या अधिकार क्षेत्रातील आणि गाव ओशिवरा, तालुका अंधेरी, जिल्हा मुंबई उपनगर येथे स्थित सीटीएस क्र. १/६१ धारक जमिनीच्या प्लॉटवर बांधलेल्या वुड रोज नावाच्या इमारतीमधील बी विंग मधील तळ मजल्यावरचे ३९० चौ. फूट मोजमापित दुकान क्र. ४.

viii) श्री. महेश चंद्र अगरवाल आणि श्री. मनिष अगरवाल यांच्या मालकीचे मुंबई शहर व उपनगरच्या नोंदणी आणि उप-नोंदणी जिल्ह्यातील सीटीएस क्र. १/३८/३ए१, के वेस्ट, वेस्ट वॉर्ड, भाग १२ येथील ओशिराच्या सर्व्हे क्र. ४१(भाग) च्या सब-प्लॉट क्र. १२१ धारक जमिनीच्या प्लॉटवर उभ्या लोखंडवाला कॉम्प्लेक्स, वर्सोवा, अंधेरी पश्चिम, मुंबई-४०००५८ येथे स्थित मेघदूत नावाच्या इमारतीमधील ए विंग मधील २० व्या मजल्यावरील ३२० चौ. फूट सुपर बिल्ट अप, ५४४ चौ. फूट सुपर बिल्ट अप आणि ७६७ चौ. फूट सुपर बिल्ट अप (व्हॅल्युएशन रिपोर्टनुसार) मोजमापित फ्लॅट क्र. २००४, २००५ आणि २००६ (एकत्रित).

ix) मर्यादा सोडवून घेण्यापूर्वी स्थावर मिळकतींच्या स्वरुपांत जास्तीचे सांपार्श्विक तारण मिळवायचे आहे.

**टाटा कॅपिटल फायनान्शीअल सर्व्हिसेस लिमिटेडसाठी**
**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**

**दिनांक:** २२ मे, २०२०
**ठिकाण:** मुंबई

epaper.freepressjournal.in